# चमकणारे जीव

गोष्ट - केतकी घाटे | चित्र - मधुरा वाणी

अंधार झाला आणि आपलं शरीर चमकायला लागलं तर? तुला माहीत आहे पृथ्वीवर राहणारे काही जीव शरीरातून प्रकाश बाहेर सोडतात. जिथे अगदी अंधार गुडूप असतो अशा ठिकाणी हे जीव राहतात.

## चमकणाऱ्या समुद्राच्या लाटा

समुद्रात काही बॅक्टेरिया (जीवाणू ) आणि बुरश्या सतत प्रकाश सोडतात. या प्रकाशामुळे लाटा चमकत आहेत असं वाटतं. शत्रूपासून वाचण्यासाठी हे जिवाणू हा निळसर प्रकाश सोडतात.





## जेलीफिश

काही जेलिफिश खोल समुद्रात चमकतात आणि शत्रूला चकवतात.







## बीटल

ही बीटल म्हणजेच भुंगेऱ्याची अळी बघितलीस? तिच्या अंगावर चमकणाऱ्या हिरव्या ठिपक्यांच्या दोन रांगा आहेत. आणि डोक्यावर दोन लाल ठिपके आहेत. या नक्षीमुळे ती रेल्वेच्या डब्यांसारखी दिसते. म्हणून तिला रेलरोड बीटल म्हणतात. ही बीटल अमेरिकेत सापडते.

## शंख

काही समुद्री शंख प्रकाश सोडतात. त्यामुळे ते हिरवेगार दिसतात. हे शंख तसे दुर्मिळ आहेत. ऑस्ट्रेलियाच्या काही भागात दिसतात.



## मश्रुम

हिरव्या रंगात चमकणारे हे मश्रुम सह्याद्रीच्या जंगलात दिसतात. हे मश्रुम म्हणजे बुरशीच असते. सकाळी पांढऱ्या दिसणाऱ्या ह्या टोपी बुरश्या रात्र झाली की सुंदर मंद हिरव्या प्रकाशात चमकतात.



ह्या सगळ्यांमध्ये ल्युसिफेरीन नावाचं रसायन असतं. त्यामुळेच प्रकाश उत्सर्जित होतो. आहे की नाही भन्नाट गोष्ट? जर आपल्या बोटातून प्रकाश बाहेर पडला तर कसली मज्जा येईल नं! फिर्र्र्र्स...

